सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १५

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३

(५ जून २०१५ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. XV of 1993

# The Maharashtra State Commission for Women Act, 1993

*(As modified upto 5th June, 2015)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[किंमत रु. ११-००]

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३

## अनुक्रमणिका

उद्देशिका.


| कलमे. | पृष्ठ |
|---|---|
| १. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. .. .. .. | १ |
| २. व्याख्या. .. .. .. | १ |
| ३. आयोगाची रचना. .. .. .. | २ |
| ४. अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती. .. .. | २ |
| ५. आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी. .. .. .. | ३ |
| ६. अनुदानातून वेतन व भत्ते यांचे प्रदान करणे. .. .. .. | ३ |
| ७. रिक्त पदे इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही अवैध न ठरणे. .. .. | ४ |
| ८. आयोगाच्या समित्या. .. .. .. | ४ |
| ९. आयोगाने विनियमित करावयाची कार्यपध्दती. .. .. .. | ४ |
| १०. आयोगाची कामे. .. .. .. | ४ |
| ११. शासनाने आयोगाशी विचारविनिमय करणे. .. .. .. | ७ |
| १२. तपास करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांच्या व तपास अभिकरणांच्या सेवा वापरण्याचा आयोगाचा अधिकार. .. .. .. | ७ |
| १३. व्यक्तींनी आयोगाकडे केलेली कथने. .. .. .. | ८ |
| १४. स्वयंसेवी संघटनांची नोंदणी व त्यांचे सहाय्य घेणे. .. .. .. | ८ |
| १५. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. .. .. .. | ९ |
| १६. राज्य शासनाकडून अनुदाने. .. .. .. | ९ |
| १७. लेखे व लेखापरीक्षा. .. .. .. | ९ |
| १८. वार्षिक अहवाल. .. .. .. | १० |
| १९. वार्षिक व इतर अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमोर मांडणे. | १० |
| २०. अध्यक्ष, सदस्य इत्यादी लोकसेवक असणे. .. .. .. | १० |
| २१. नियम तयार करण्याचा अधिकार. .. .. .. | १० |
| २२. अडचणी दूर करण्याचा अधिकार. .. .. .. | १० |
| २३. सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती. .. | १० |

# सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५[1]

# [महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३.]

[राष्ट्रपती यांची दि. २४ एप्रिल, १९९३ रोजी संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार" मध्ये दिनांक २५ एप्रिल, १९९३ रोजी प्रसिध्द केला.]

**महाराष्ट्र राज्यातील स्त्रियांसाठी राज्य पातळीवरील आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाचे अनुच्छेद १४, १५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता राज्याच्या धोरणाची आणि विशेषत: संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९ अ व ४२ मध्ये अंतर्भूत केलेली निदेशक तत्वे अंमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करुन योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्यांचे परिणामकारकरीत्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींबर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी एका आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** यासाठी तात्काळ कायदा करणे आवश्यक वाटले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून त्यांनी २५ जानेवारी, १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोग अध्यादेश, १९९३ हा प्रख्यापित केला होता ; (१९९३ चा महा. अध्या. ७)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :--

**संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३' असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, २५ जानेवारी, १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,–

(अ) "आयोग" म्हणजे, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य महिला आयोग ;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९९३, भाग पाच, (इंग्रजी) पृष्ठ २२ पहा.

(ब) "पोलीस महासंचालक" म्हणजे, महाराष्ट्र राज्याचा पोलीस महासंचालक ;

(क) "सदस्य" म्हणजे, आयोगाचा सदस्य, आणि त्यात अध्यक्षाचा व सदस्य-सचिवाचा समावेश आहे ;

(ड) "राष्ट्रीय महिला आयोग" म्हणजे, राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९० याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेला राष्ट्रीय महिला आयोग ; १९९० चा २०.

(ई) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित ;

(फ) "महिला" या संज्ञेमध्ये बालिकांचा किंवा किशोरवयीन मुलींचा समावेश आहे.

आयोगाची रचना.

३. (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, "महाराष्ट्र राज्य महिला आयोग" या नावाने संबोधण्यात यावयाची एक संस्था स्थापन करील व ती संस्था, या अधिनियमान्वये तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व नेमून देण्यात आलेली कर्तव्ये पार पाडील.

(२) या आयोगामध्ये, पुढील व्यक्तींचा समावेश असेल,--

(अ) अध्यक्ष, ही महिलांच्या कल्याणासाठी जिने स्वत:ला वाहून घेतले आहे अशी एक मान्यवर महिला असेल ;

(ब) सहापेक्षा अधिक नसतील असे शक्यतोवर महिला अशासकीय सदस्य, यांचे नामनिर्देशन राज्य शासन, ज्यांनी महिलांसाठी कार्य केले आहे किंवा ज्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान व अनुभव आहे, तसेच महिलांच्या विकासासंबंधीच्या बाबींच्या प्रशासनाचा किंवा महिलांचे संरक्षण, त्यांचा दर्जा उंचावणे किंवा त्यांच्या सर्वसाधारण हितसंबंधाचे संवर्धन यांसाठी कार्य करणाऱ्या श्रमिक संघटनांचे किंवा महिला स्वयंसेवी संघटनांचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे अशा समर्थ, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्तींमधून करील :

परंतु, प्रत्येकी किमान एक सदस्य हा अनुक्रमे अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींमधील असेल :

परंतु आणखी असे की, अध्यक्षांचे नामनिर्देशन करण्यापूर्वी राज्य शासन, महाराष्ट्र राज्यातील महिला संघटनांशी विचारविनिमय करील ;

(क) पोलीस महासंचालक हा आयोगाचा पदसिध्द सदस्य असेल ;

(ड) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य सचिव, ही राज्य नागरी सेवेत किंवा अखिल भारतीय सेवेत असलेली किंवा राज्याच्या अखत्यारीतील नागरी पद धारण करणारी व समुचित अनुभव असलेली सह सचिवाच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाची महिला अधिकारी असेल.

अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती.

४. (१) अध्यक्ष व प्रत्येक अशासकीय सदस्य तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील.

(२) अध्यक्ष किंवा अशासकीय सदस्य यांना, कोणत्याही वेळी, राज्य शासनाला संबोधून अध्यक्षपदाचा किंवा सदस्यपदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, अध्यक्ष पदावरील किंवा सदस्य पदावरील व्यक्तीला,--

(अ) ती व्यक्ती अमुक्त दिवाळखोर झाली असेल ;

(ब) राज्य शासनाच्या मते ज्यात नैतिक अध:पाताचा संबंध असेल अशा अपराधासाठी त्या व्यक्तीला सिध्दापराध ठरविण्यात आले असेल व कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल ;

(क) ती व्यक्ती मनोविकल झाली असेल व सक्षम न्यायालयाने तसे जाहीर केलेले असेल ;

(ड) ती व्यक्ती कार्य करण्यास नकार देत असेल किंवा कार्य करण्यास असमर्थ ठरली असेल ;

(ई) ती व्यक्ती आयोगाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली असेल ;

(फ) राज्य शासनाच्या मते त्या व्यक्तीला त्या पदावर ठेवणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल अशा प्रकारे तिने अध्यक्ष किंवा सदस्य याच्या पदाचा दुरुपयोग केला असेल किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पदावर राहण्यास ती अन्य प्रकारे अपात्र किंवा अयोग्य ठरली असेल ;

तर त्या पदावरुन दूर करु शकेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, त्या बाबतीतील तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी तिला दिल्याशिवाय या पोट-कलमान्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये किंवा अन्य कोणत्याही प्रकारे रिक्त झालेले पद, राज्य शासनाकडून, शक्य तितक्या लवकर, नवीन नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल ; व अशाप्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती, जिच्या रिक्त पदावर तिचे नामनिर्देशन झाले आहे त्या व्यक्तीने, ते पद रिक्त झाले नसते तर ज्या मुदतीकरिता ते धारण केले असते त्या उर्वरित मुदतीकरिता ते पद धारण करील :

परंतु, अध्यक्षाव्यतिरिक्त अन्य सदस्याचे पद, त्या सदस्याचा पदावधी ज्या दिनांकाला समाप्त होतो त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांत रिक्त झाल्यास, ते रिक्त पद भरण्यात येणार नाही.

(५) अध्यक्ष व सदस्य यांना कोणतेही मानधन देय असल्यास ते मानधन व देय भत्ते आणि त्यांच्या पदधारण करण्यासंबंधीच्या इतर अटी व शर्ती या विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

**आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी.**

५. (१) राज्य शासन, त्याच्या मते आयोगाची या अधिनियमाखालील कामे कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता आवश्यक असतील असे अधिकारी व इतर कर्मचारी यांची आयोगासाठी तरतूद करील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्ती करण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**अनुदानातून वेतन व भत्ते यांचे प्रदान करणे.**

६. अध्यक्ष आणि सदस्य यांना देय असलेले मानधन व भत्ते आणि कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेले अधिकारी आणि इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते आणि निवृत्तिवेतन यासह प्रशासकीय खर्च याबाबी कलम १६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानांतून भागविण्यात येतील.

**रिक्त पदे इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही अवैध न ठरणे.** ७. केवळ आयोगामध्ये कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या किंवा अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नामनिर्देशनात कोणताही दोष असल्याच्या किंवा आयोगाच्या कार्यपध्दतीमध्ये, बैठक घेण्यासंबंधीची नोटीस काढण्यामधील नियमबाह्यतेसह, संबंधित बाबीच्या तथ्यांवर परिणाम न करणारी कोणतीही नियमबाह्यता असल्याच्या कारणावरुन, आयोगाच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस हरकत घेण्यात येणार नाही किंवा ती अवैध ठरणार नाही.

**आयोगाच्या समित्या.** ८. (१) आयोगाला त्याची कार्ये व कर्तव्ये प्रभावीरीत्या करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी आणि अधिकारांचा प्रभावीरीत्या वापर करण्यासाठी तसेच आयोगाकडून वेळोवेळी हाती घेण्यात येतील अशा विशेष प्रश्नांवर कार्यवाही करण्याकरिता आवश्यक वाटतील अशा समित्यांची नियुक्ती करता येईल.

(२) आयोगाला, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे एका किंवा अधिक व्यक्तींना पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या कोणत्याही समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्याचा अधिकार असेल, आणि आयोगाचा सदस्य नसलेल्या अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याचा आणि बैठकीच्या कार्यवाहीमध्ये भाग घेण्याचा हक्क राहील, परंतु त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) अशाप्रकारे नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला, बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आणि समितीच्या अन्य कोणत्याही कामासाठी होणाऱ्या खर्चादाखल विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(४) **आयोग,** त्याच्या कोणत्याही बैठकींसाठी, राष्ट्रीय महिला आयोगाच्या कोणत्याही प्रतिनिधीला निमंत्रित करु शकेल ; किंवा आयोग आवश्यक त्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे पालन करण्याकरिता किंवा या अधिनियमाखालील त्याची कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याकरिता जिचे सहाय्य किंवा सल्ला त्यास आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला, त्यास वाटेल अशारितीने व अशा प्रयोजनांसाठी सहभागी करुन घेऊ शकेल; आणि अशा नियंत्रित केलेल्या किंवा सहभागी करुन घेतलेल्या व्यक्तीला, ज्या प्रयोजनांसाठी त्या प्रतिनिधीला किंवा व्यक्तीला निमंत्रित करण्यात आले असेल किंवा सहभागी करुन घेण्यात आले असेल त्या प्रयोजनांशी संबंधित, अयोगाच्या चर्चांमध्ये भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु मत देण्याचा अधिकार असणार नाही.

**आयोगाने विनियमित करावयाची कार्यपध्दती.** ९. (१) आयोग किंवा त्याची समिती आवश्यक असेल त्या त्या वेळी आणि अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल.

(२) आयोग आपली स्वत:ची व आपल्या समित्यांची कार्यपध्दती विनियमित करील.

(३) आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय, सदस्य-सचिव किंवा सदस्य-सचिवाने यासंबंधात रीतसर प्राधिकृत केलेला आयोगाचा अन्य कोणताही अधिकारी अधिप्रमाणित करील.

**आयोगाची कामे.** १०. (१) आयोग पुढील सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील :-

(अ) संविधान व अन्य कायदे यांनुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे ;

(ब) त्या संरक्षक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल आणि आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे ;

(क) स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे ;

(ड) संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवेळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजना सुचविण्यासाठी सुधारणांची शिफारस करणे ;

(ई) स्त्रियांशी संबंधित असलेल्या, संविधानातील व अन्य कायद्यांमधील तरतुदींचा भंग झाला असेल अशा प्रकरणांमध्ये राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणांकडे दाद मागणे ;

(फ) पुढील गोष्टींशी संबंधित बाबींच्या तक्रारी विचारार्थ स्वीकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेणे :--

(एक) स्त्रियांचे अधिकार हिरावून घेणे ;

(दोन) स्त्रियांना संरक्षण देण्यासाठी आणि तसेच समानतेचे व विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे ;

(तीन) स्त्रियांच्या हालअपेष्टा कमी करणे आणि त्यांच्या कल्याणाची सुनिश्चिती करणे व त्यांना सहाय्य करणे या उद्देशाने घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय, घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेल्या सूचना यांचे पालन न करणे,

आणि अशा बाबींमधून उद्भवणाऱ्या प्रश्नांबाबत राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणांकडे दाद मागणे ;

(ग) भारताच्या संविधानातील स्त्रियांशी संबंधित असलेल्या तरतुदींच्या किंवा स्त्रियांशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांच्या भंगाच्या संबंधात कोणत्याही न्यायिक मंचाकडे किंवा न्यायाधिकरणाकडे कार्यवाही सुरु करण्यासाठी गरजू महिलांना मार्गदर्शन करणे व सल्ला देणे ;

(ह) स्त्रियांच्या बाबतीत करण्यात येणारा भेदभाव आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार यांमधून उद्भवणाऱ्या विशिष्ट समस्यांचा किंवा परिस्थितीचा विशेष अभ्यास किंवा चौकशी करण्याची मागणी करणे आणि असा भेदभाव व अत्याचार होऊ नयेत याबाबतच्या कार्यतंत्रांची शिफारस करण्यासाठी काही निर्बंध निश्चित करणे ;

(आय) स्त्रियांना सर्व क्षेत्रांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळण्याची निश्चिती करण्यासाठी उत्तेजनात्मक आणि शैक्षणिक संशोधन सुरु करणे व जागेची सोय व मूलभूत सुविधा न मिळणे, निर्वाहविषयक अपुऱ्या व्यवस्था यांसारख्या, त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा आणण्यास जबाबदार असलेल्या गोष्टी आणि त्यांचे काबाडकष्ट व व्यवसायातील आरोग्यविषयक धोके कमी करणारी तंत्रे शोधून काढणे ;

(जे) स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे ;

(के) राज्यातील स्त्रियांच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे ;

(ल) (एक) तुरुंग, सुधारगृह, स्त्रियांची संस्था किंवा स्त्रियांना जेथे कैदी म्हणून किंवा अन्य प्रकारे ठेवण्यात येते अशी अभिरक्षेची अन्य ठिकाणे यांची तपासणी करणे किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करणे आणि आवश्यक वाटेल त्याप्रमाणे सुधारात्मक उपाययोजनांसाठी अशा बाबींसंबंधात संबंधित प्राधिकरणांशी विचारविनिमय करणे ;

(दोन) राज्यात, कोणत्याही न्यायालयांकडून गुप्तरीत्या न्यायचौकशी करण्यात येत असेल अशा बाबींसह, महिलांच्या अधिकारांच्या संरक्षणाचा संबंध असलेल्या कोणत्याही प्रकरणी किंवा प्रश्नांच्या बाबतीत, संबंधित न्यायालयात किंवा लोकन्यायालयात हजर राहणे आणि संबंधित न्यायालय किंवा लोकन्यायालय यांच्या परवानगीने अशा न्यायालयात किंवा लोकन्यायालयात बाजू मांडण्याचा हक्क असणे ;

(म) स्त्रियांच्या मोठ्या गटावर परिणाम करणारे प्रश्न किंवा स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या, संविधानातील किंवा अन्य कोणत्याही कायद्यांतील कोणत्याही तरतुदीच्या अर्थउकलीचा प्रश्न अंतर्भूत असलेल्या पोलीस तक्रारीसह न्यायालयात गेलेल्या प्रकरणांसाठी निधी पुरवणे आणि अशा बाबींशी संबंधित अहवाल दर सहा महिन्यांनी राज्य शासनाला सादर करणे ;

(न) स्त्रियांशी आणि विशेषतः स्त्रिया ज्या कठीण परिस्थितीत काबाडकष्ट करतात त्या विविध कठीण परिस्थितीशी संबंधित कोणत्याही बाबींबद्दल राज्य शासनाकडे नियतकालिक अहवाल पाठवणे ;

(ओ) राष्ट्रीय महिला आयोग आणि वेगवेगळ्या राज्य शासनांनी स्थापन केलेले इतर महिला आयोग आणि तसेच, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग व अल्पसंख्यांक आयोग यांना सहकार्य व मदत करणे आणि त्यांचे सहकार्य व मदत मिळवणे ;

(प) या अधिनियमाची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या किंवा अन्य कोणत्याही समुचित प्राधिकरणाच्या विचारार्थ योजना तयार करणे आणि विशेषतः परित्यक्तांना पोटगी देणे, किमान वेतन देणे, समान कामासाठी समान वेतन दिले जाण्याची निश्चिती करणे, स्त्रियांसाठी निवासाची व निवाऱ्याची व्यवस्था करणे, घरात केल्या जाणाऱ्या छळास प्रतिबंध करणे, कामावर असताना केल्या जाणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करणे, स्त्रियांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे आरोग्य व सुरक्षितता यांत सुधारणा करणे आणि स्त्रियांना कायदेविषयक सहाय्य देणे यांच्या संबंधीच्या कायद्यांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्यासाठी योजना तयार करणे ;

(क्यू) राज्य शासन किंवा राष्ट्रीय महिला आयोग त्याच्याकडे पाठवील अशा इतर कोणत्याही बाबी.

(२) आयोगाला पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये किंवा खंड (फ) चे उप-खंड (एक) व (दोन) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींचा तपास करताना खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे, विशेषकरुन पुढील गोष्टींच्या बाबतीतील सर्व अधिकार असतील :-

(अ) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे ;

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे ;

(क) शपथपत्रांवरील साक्षी पुरावा स्वीकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे ;

(ई) साक्षीदारांच्या व दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ; आणि

(फ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) (अ) पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये किंवा खंड (फ) चे उप-खंड (एक) व (दोन) यांमध्ये निर्देश केलेला कोणताही तपास पूर्ण झाल्यानंतर, आयोगाला, पोट-कलम (१) च्या खंड (ई) किंवा (फ) अन्वये राज्य शासनाशी किंवा समुचित प्राधिकरणाशी या बाबीवर विचारविनिमय करून, त्या बाबीसंबंधात कायदेशीर कार्यवाही किंवा खटला दाखल करण्याची शिफारस यथास्थिति राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणाकडे करता येईल आणि त्याचप्रमाणे अशी कोणतीही कायदेशीर कार्यवाही, किंवा खटला चालविण्याकरिता समुपदेशी किंवा विशेष अभियोक्ता नियुक्त करण्यासाठी राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणाकडे शिफारस करता येईल ; आणि राज्य शासन, प्रकरणाचे स्वरुप लक्षात घेऊन आणि त्याच्या मताप्रमाणे समुपदेशी किंवा विशेष अभियोक्ता यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री पटली असेल तर तसे करु शकेल.

(ब) यथास्थिति, राज्य शासन किंवा समुचित प्राधिकरण आयोगाच्या शिफारशीवरुन दाखल केलेल्या अशा कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीची किंवा खटल्याची प्रगती आयोगाला वेळोवेळी लेखी कळवील.

(४) राज्य शासन किंवा समुचित प्राधिकरण आयोगाशी लेखी स्वरुपात अगोदर विचारविनिमय केल्याशिवाय, पोट-कलम (३) अन्वये दाखल केलेले असे कोणतेही प्रकरण किंवा खटला काढून घेण्यासाठी अर्ज करणार नाही.

**शासनाने आयोगाशी विचारविनिमय करणे.**

**११.** राज्य शासन, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या धोरणविषयक सर्व प्रमुख बाबींसंबंधात आयोगाशी विचारविनिमय करील.

**तपास करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांच्या व तपास अभिकरणांच्या सेवा वापरण्याचा आयोगाचा अधिकार.**

**१२.** (१) आयोगाला, या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी,--

(अ) राज्याच्या, किंवा केंद्र सरकारच्या सहमतीने त्या सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा तपास अभिकरणाच्या ; किंवा

(ब) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या,

सेवांचा वापर करता येईल.

(२) तपास करण्याच्या प्रयोजनासाठी, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही अधिकारी किंवा कोणतेही अभिकरण आयोगाच्या निदेशनाच्या व नियंत्रणाच्या अधीन राहून,--

(अ) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी समन्स पाठवू शकेल व हजर राहण्यास भाग पाडू शकेल आणि तिची तपासणी करु शकेल ;

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावू शकेल, आणि

(क) कोणत्याही कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवू शकेल.

(३) असा अधिकारी किंवा असे अभिकरण किंवा अशी व्यक्ती, आयोगाने दिलेल्या निदेशानुसार त्या बाबीसंबंधात तपास करील आणि त्याबाबतचा अहवाल (या कलमामध्ये यापुढे ज्याचा निर्देश "तपास अहवाल" असा करण्यात आला आहे ) आयोगाकडून यासंबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल किंवा वाढविण्यात येईल अशा कालावधीमध्ये किंवा अशा वाढविलेल्या कालावधीमध्ये आयोगाकडे सादर करील.

(४) आयोग, पोट-कलम (३) अन्वये त्याच्याकडे सादर करण्यात आलेल्या तपास अहवालात नमूद केलेली वस्तुस्थिती व कोणतेही निष्कर्ष काढण्यात आलेले असल्यास ते निष्कर्ष अचूक असल्याबद्दल स्वत:ची खात्री करुन घेईल व या प्रयोजनार्थ आयोगाला, (तपास करणाऱ्या किंवा तपास कामात सहाय्य करणाऱ्या एका किंवा अनेक व्यक्तींची तपासणी करणे यासह), त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल.

**व्यक्तींनी आयोगाकडे केलेली कथने.**

**१३.** एखाद्या व्यक्तीने आयोगापुढे किंवा कलम १२ च्या पोट-कलम (१), खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या अधिकाऱ्यापुढे किंवा अभिकरणापुढे किंवा त्या कलमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीपुढे साक्ष देताना केलेल्या कोणत्याही कथनामुळे अशी व्यक्ती, अशा कथनाद्वारे खोटी साक्ष दिल्याबद्दल भरावयाच्या खटल्याव्यतिरिक्त कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही दाखल केली जाण्यास पात्र ठरणार नाही किंवा अशा कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीत अशा कथनाचा तिच्याविरुध्द वापर करण्यात येणार नाही :

परंतु असे कथन,--

(अ) आयोगाने किंवा अशा अधिकाऱ्याने किंवा अभिकरणाने किंवा अशा व्यक्तीने ज्या प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक केले असेल अशा प्रश्नाच्या उत्तरादाखल केलेले असेल, किंवा

(ब) तपास चालू असलेल्या विषयाशी संबंधित असेल.

**स्वयंसेवी संघटनांची नोंदणी व त्यांचे सहाय्य घेणे.**

**१४.** (१) राज्यातील कोणत्याही स्त्रियांसाठी असलेल्या स्वयंसेवी संघटनेला, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, आयोगाकडे नोंदणी करवून घेता येईल. आयोगास, अशा संघटनेचे समाजातील महत्त्व व भूमिका याबद्दल स्वत:स योग्य वाटेल अशा रीतीने स्वत:ची खात्री करुन घेतल्यानंतर, आयोगाच्या नोंदवहीमध्ये अशा संघटनेचे नाव दाखल करता येईल.

(२) आयोगाला, राज्यातील स्वयंसेवी संघटनांची आणि विशेषत: त्याला आपली कामे पार पाडताना ज्यांचे सहाय्य मागता येईल अशा महिला संघटनांची नोंदवही ठेवता येईल.

(३) आयोगाला त्याची कामे पार पाडीत असताना, राज्यातील कोणत्याही स्वयंसेवी संघटनांचे, विशेष करुन, महिला संघटनांचे सहाय्य मागता येईल.

(४) आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेल्या अशा संघटनांची सूची, कोणत्यांही न्यायालयाला किंवा प्राधिकरणाला किंवा विनंतीवरुन सर्वसाधारण जनतेला उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) आयोगाला, त्याच्या नोंदवहीतून कोणत्याही संघटनेचे नाव लेखी नोंद करावयाच्या कोणत्याही कारणांसाठी रद्द करणे योग्य वाटल्यास, अशा संघटनेला आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर आयोगाला तसे करता येईल.

(६) अशाप्रकारे नाव रद्द करण्यासंबंधीचा आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

**सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

**१५.** या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यानुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात आयोगाच्या कोणत्याही सदस्यांविरुध्द किंवा आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुध्द किंवा अन्य कर्मचाऱ्यांविरुध्द किंवा राज्य शासनाच्या अथवा आयोगाच्या निदेशानुसार कृती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**राज्य शासनाकडून अनुदाने.**

**१६.** (१) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने यासंबंधातील कायद्याद्वारे रीतसर विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी वापर करण्याकरिता त्यास योग्य वाटतील अशा रकमा आयोगाला राज्याच्या एकत्रीकृत निधीमधून, अनुदानांच्या स्वरुपात देईल.

(२) या अधिनियमाखालील कामे पार पाडण्यासाठी अयोगाला, त्यास योग्य वाटतील अशा रकमा खर्च करता येतील आणि अशा रकमा, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानांतून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

**लेखे व लेखापरीक्षा.**

**१७.** (१) आयोग योग्य ते लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि महाराष्ट्र राज्याच्या महालेखापालांशी विचारविनिमय करुन राज्य शासन विहित करील अशा नमुन्यामध्ये लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) राज्याचा महालेखापाल, तो विनिर्दिष्ट करील अशा ठरावीक कालांतरांनी, आयोगाच्या वार्षिक लेख्यांची परीक्षा करील आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात झालेला कोणताही खर्च आयोगाकडून महालेखापालाला देय असेल.

(३) महालेखापाल आणि या अधिनियमान्वये आयोगाच्या लेख्यांची परीक्षा करण्याच्या संबंधात त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात, महालेखापालाला सर्वसाधारणपणे शासकीय लेख्यांच्या परीक्षेच्या संबंधात जे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषत: पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके व अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याचा आदेश देण्याचा आणि आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) आयोग, महालेखापालाने किंवा यासंबंधात त्याने यथोचितरीत्या नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीने प्रमाणित केलेल्या आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, दरवर्षी, राज्य शासनाकडे पाठवील.

वार्षिक अहवाल. १८. आयोग, मागील वित्तीय वर्षातील त्यांच्या कार्याचा पूर्ण वृतांत देणारा त्याचा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशा वेळी तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे पाठवील.

वार्षिक व इतर अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल राज्य विधान-मंडळासमोर मांडणे. १९. राज्य शासन, वार्षिक अहवाल व कलम १०, पोट-कलम (१), खंड (ब), (म) व (न) खालील सर्व अहवाल, त्यांमधील राज्य शासनाशी संबंधित असतील अशा शिफारशींच्या संबंधात केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा शिफारशींमधील कोणत्याही शिफारशी स्वीकारण्यात आल्या नसल्यास, त्यासंबंधीची कारणे व लेखापरीक्षा अहवाल यांसह, ते अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

अध्यक्ष, सदस्य, इत्यादी लोकसेवक असणे. २०. आयोगाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

नियम तयार करण्याचा अधिकार. २१. (१) या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याकरिता राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि पूर्व प्रसिध्दीच्या शर्तीच्या अधीन राहून, नियम करता येतील. या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी शुल्क आकारण्यासाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त अधिवेशनाच्या किंवा लागोपाठच्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, तर तो नियम, त्यानंतर यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. २२. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर राज्य शासन **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करु शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

सन १९९३ चा महा. अध्या. क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती. २३. (१) महाराष्ट्र राज्य महिला आयोग अध्यादेश, १९९३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९३ चा महा. अध्या. ७.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कारवाई (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा करण्यात आलेले कोणतेही नामनिर्देशन, नेमणूक, नियम किंवा आदेश धरुन) ही ह्या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये यथास्थिति, करण्यात किंवा काढण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

शामुको.-एच ३५४-४१३० पु.-६-२०१५

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर